



Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड

व्यापक जनचळवळीची प्रहरी!






संपादक : जितेंद्र कायस्थ

Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com

वर्ष ३ रे अंक : ७८५. वा मंगळवार दि. २८ मे २०२४ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये


# जिल्हा रुग्णालय भ्रष्टाचारातील बड्या माशांवर शिकंजा कधी?

## प्रकाश बोथे तर अडकले, परंतु बड्या भ्रष्टाचाऱ्यांवरही कारवाई अपेक्षित

**जनसंचलन/बुलढाणा**

येथील जिल्हा रुग्णालयात बोकाळलेल्या भ्रष्टाचाराच्या गटारगंगेतील प्रकाश नामदेव बोथे नामक एक भ्रष्टाचारी मासा तर चौकशी समितीच्या गळाला लागला, परंतु अद्यापही या ठिकाणचे अनेक बडे भ्रष्टाचारी अद्यापही मोकाट असून, त्यांच्यावर कारवाई होणार का की, केवळ बोथे यांनाच बळीचा बकरा केला असा सवाल आता उपस्थित होऊ लागला आहे. त्यामुळे जर खऱ्या अर्थाने बड्या धेंडावर कारवाई झाली, तरच भ्रष्टाचाराचे या ठिकाणाहून उच्चाटन होऊ शकणार आहे. जिल्हा रुग्णालयात जो काही प्रचंड भ्रष्टाचार बोकाळलेला आहे, त्यापासून आता सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनचे वाचक अजिबात अनभिज्ञ नाहीत. कारण गेल्य काही महिन्यांपासून सातत्याने दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज या ठिकाणच्या भ्रष्टाचाराचा भंडाफोड करीत आहे. जिल्हा रुग्णालयात एकीकडे प्रचंड अशी अनागोंदी बोकाळलेली आहे, तर दुसरीकडे भ्रष्टाचाराने थैमान घातले आहे. जिल्हा रुग्णालयातील अनेक झारी-तील शुक्राचार्य हे सर्वसामान्यांच्या मुळावर उठलेले दिसून येत आहेत. त्यापैकीच एक महाभाग आ-हेत माजी भांडारपाल प्रकाश नामदेव बोथे. यांचा भांडारपालपदाचा कार्यकाळ हा पूर्णपणे भ्रष्टाचाराने काळवंडलेला आहे, यात काही शंका नाही. जिल्हा रुग्णालयात स्टेशनरी साहित्य व विविध उपकरणांमध्ये प्रचंड प्रमाणात घोळ झालेला आहे. त्याला

### पोस्टमार्टम १२

प्रथमदर्शनी प्रकाश नामदेव बोथे हे जबाबदार आहेत, हे अखेर चौकशी समितीलाही मान्य करावे लागले. खरे तर दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज सारखे वृत्तपत्र आणि काही विविध सामाजिक संघटनांचा दबाव, तसेच आमदार संजय गायकवाड यांची विधानसभेतील लक्षवेधी या सर्वांचा दबाव नसता, तर या ठिकाणचा भ्रष्टाचार हा कधीही चव्हाट्यावर आला नसता. काहीही असले तरी जिल्हा रुग्णालयातील भ्रष्टाचार जनतेसमोर उजागर करण्याचे सर्वांत आधी श्रेय हे सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनचेच. कारण या भ्रष्टाचाराला सर्वांत आधी वाचा फोडण्याचे काम दैनिक जनसंचलननेच केलेले आहे. त्याला इतरांचीही साथ लाभलेली आहे. जिल्हा रुग्णालयात कोरोना महामारीच्या आधीप-ासूनच प्रचंड प्रमाणात भ्रष्टाचार माजलेला आहे. एकीकडे भांडार विभागातील भ्रष्टाचार, दुसरीकडे कॅशबुकातील आर्थिक घोळदेखील प्रचंड झालेला आहे. माजी रोखपाल पी. के. माळी यांनी त्यांच्या कार्यकाळात कॅशबुकात प्रचंड प्रमाणात खाडाखोड करून लाखो रुपयांचा भ्रष्टाचार केलेला आहे. प्रचंड भ्रष्टाचार करून पी. के. माळी हे तर जिल्हा रुग्णालयातून निसटले, परंतु विद्यमान रोखपाल आर. एस.लाकडे हे देखील भ्रष्टाचाराच्या या नंदनवनात

**भ्रष्टाचारातून कमावलेली चल अचल संपत्ती / अपसंपदाची पुराव्यानिशी पूर्ण माहिती तक्रारकर्ते आर्थिक गुंन्हे व आयकर विभागाकडे सोपवणार असल्याची माहिती सूत्रांकडून मीळाली आहे.**

मुक्तपणे संचार करीत आहेत. त्यांच्याकडे कोणतीही माहिती मागितली ते अत्यंत साळसूदपणाचा आणि निष्पापपणाचा आव आणतात आणि मला काहीच माहिती नसल्याचा बनाव करतात. त्यांनी माळी यांच्याकडून पदभार स्वीकारतानाही तो पूर्णपणे स्वीकारला नाही.खरे तर त्यांचा हा गंभीर प्रमाद आहे. परंतु जिल्हा रुग्णालयात सगळे काही खपून जाते. या रुग्णालयात गेल्या काही वर्षांमध्ये आलेले जिल्हा शल्यचिकित्सक तसेच वेगवेगळ्या काळात आरोग्य अधीक्षक पदावर येऊन गेलेले अधिकारी असे सगळेच दोषी आहेत. याचा स्पष्ट अर्थ आहे की, जिल्हा रुग्णालयात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचाराचे सामुहिकीकरण झाले आहे. खरे तर हा सामुहिक अपराध आहे, त्यामुळे उद्या या सर्वांवर मकोकासारखे गंभीर कायदे लागू केले पाहिजेत. कारण सगळा भ्रष्टाचार हा एकमेकांच्या हातात-हात घालून करण्यात आलेला आहे. त्यामुळे या ठिकाणी गेल्या काही वर्षांत येऊन गेलेल जिल्हा शल्यचिकित्सक, आरोग्य अधीक्षक, भांडारपाल, रोखपाल अशा अनेकांची चौकशी करून त्यांच्यावर कायदेशीर कडक कारवाई करणे गरजेचे आहे. भांडारपाल प्रकाश बोथे हे केवळ हिमनगाचे टोक







आहे. जिल्हा रुग्णालयातील भ्रष्टाचार उकरून काढायचे म्हटले तर या ठिकाणी भरपूर काही सापडू शकते आणि बडे-बडे मासे गळाला लागू शकतात. त्यामुळे केवळ बोथे यांच्यावर कारवाई करून हे प्रकरण थांबायला नको तर या ठिकाणच्या इतर अनेक अधिकाऱ्यांची पूर्व परिस्थिती व आजची परिस्थितीची सखोल चौकशी करून त्यांच्यावर कारवाई करणे अपेक्षित. संचालक संचलन , आरोग्य उपसंचालक, राज्याचे आरोग्य आयुक्त या सर्वांनी यात लक्ष घालून यासंदर्भात कारवाई अपेक्षित आहे. दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज यात पुढाकार तर घेतच आहे, आणि यापुढेही घेत राहणार आहे.


अजून बरेच काही पुढील भागात...


# सहकार विद्या मंदिरच्या १८ शाळांचा निकाल १०० टक्के

**जनसंचलन/बुलढाणा**

बुलढाणा अर्बन चॅरिटेबल सोसायटीअंतर्गत सहकार विद्या मंदिर, बुलढाणा व नांदेड जिल्ह्यात १८ शाळांनी १० वी निकालात उत्तुंग भरारी घेत बाजी मारली. बुलढाणा शहरातील सहकार विद्या मंदिरच्या शाळेने आपली १०० टक्के यशाची परंपरा कायम राखली आहे.सुमारे ३९ विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांपेक्षा जास्त गुण प्राप्त करीत विक्रम केला आहे. यामध्ये अभिनव शिरसाठ याने ९७.६० टक्के गुण मिळवीत प्रथम क्रमांक तर अनुष्का साखरेने ९७ टक्के हिने द्वितीय क्रमांक पटकाविला.तसेच सहकार विद्या मंदिर, सुल-तानपूर येथील प्रणव बोडखे यास ९५ टक्के तर अनुज भानापुरे यास ९४.४० टक्के गुण प्राप्त करून अनुक्रमे प्रथम व द्वितीय क्रमांक मिळविला. धामणगाव बढे येथे सानिका वाघमारे व सलोनी जयस्वाल यांनी ९६.२० टक्के व तेजस्विनी वैराळकर हिला ९५.८० टक्के गुण प्राप्त करून अनुक्रमे प्रथम व द्वितीय क्रमांक मिळविला. साखरखेर्डा येथे गौरी काटे हिने ९७.६० टक्के, नम्रता दळवी हिने ९७.४० टक्के गुण मिळवले. सिंदखेड राजा येथील आरती ठाकरे हिला ९४.८० टक्के, श्रद्धा वाघ यांनी ९४.८० टक्के व यश खरात ९४.२० टक्के गुण मिळविले. बिबी येथे श्रीहरी दराडे व ऋतुजा काकडे यांना ९६ टक्के, तर ऋषिकेश कणखर, प्रफुल्ल हिवाळे व अजिंक्य आटोळे याने ९५.८० टक्के गुण मिळवले. मोताळा येथील भक्ती पाटील ९७.४० टक्के, श्रुती धोरण हिला ९७.२० टक्के गुण मिळविले. धाड येथे तृप्ती धंदर व गायत्री साखरे यांनी ९५.२० टक्के तर महेंद्र सिरसाट याने ९५ टक्के गुण मिळविले. वरवट बकाल येथील रुचा चौकट हिला ९८ टक्के, तर धनश्री दाभाडे व मयूरी भोंडे यांनी ९६ टक्के गुण मिळविले. देऊळगाव राजा येथील



आदिती सुरडकर हिला ९५ टक्के तर गोपाल गव्हाणे यास ९४.४० टक्के गुण मिळाले. डोंगरखंडाळा येथील वैष्णवी राजपूत हिला ९३.४० टक्के तर गायत्री बरडे हिने ९२.८० टक्के गुण मिळवत प्रथम आणि द्वितीय क्रमांक पटकावले. उदयनगर येथील सोहम झाडे यास ९४.२० टक्के तर सोमेश हिवरकर ९३ टक्के गुण मिळविले. सहकारच्या इतर शाळांमध्येही विद्यार्थ्यांनी चांगले गुण मिळवले.

# वृद्धाला मारहाण करणाऱ्या चौघांविरोधात गुन्हा दाखल

**जनसचंलन/ खामगाव**



वृद्धाला मारहाण करून जखमी करणाऱ्या चौघांविरोधात हिवरखेड पोलिसांनी अखेर गुन्हा दाखल केला आहे. तक्रारीनुसार, खामगाव तालुक्यातील नागझरी खुर्द येथील श्याम प्रल्हाद धंदरे, राम प्रल्हाद धंदरे, पर-सराम प्रल्हाद धंदरे आणि आणखी एकाने संगनमत करून करतारसिंग जोहरसिंग डांगर (६०) या वृद्धाला वैरागड शिवारात काठीने मारहाण करून जखमी केले. या तक्रारीवरून हिवरखेड पोलिसांनी चौघा आरोपींविरोधात भादंवि. कलम ३२४, ५०४, ५०६, ३४ नुसार गुन्हा दाखल केला. आरोपींच्या गजानन नारायण मंझा नामक जावयाच्या तोंडावर दुखापत झाल्याचा वाद उकरून काढत डांगर यांना मारहाण केली.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणा मुळे इलेक्ट्रिक ग्राहक चिंता ग्रस्त,व्हीसीबी दुरुस्ती रखडली!

## अघोषित भरनियमाचा कहरच उकाड्याने रुग्ण,नागरिक त्रस्त व्हीसीबी नादुरुस्त जनमित्रांचीही डोखेदुखी...

**जनसंचलन/देऊळगावराजा**

देऊळगाव राजा तालुक्यातील पाडळी शिंदे या परिसराला कृषी व गावठाण दोन व्हीसीबी आहेत त्यातील एक व्हीसीबी खराब झाल्याने दोन्ही फिटर एकाच व्हीसीबीवर जोडल्याने दोन्ही चा भार जोडल्याने गावठाण वर बिघाड झाला तर कृषी बंद तर कृषी वर बिघाड झाला तर गावठाण बंद यामुळे परिसराला अघोषित भरनियमाचा फटका ऐन उकड्यात सहन करावा लागत आहे तसेच व्हीसीबी दुरुस्तीचे काम कित्येक दिवसापासून त्यातील लागणारे दुरुस्तीचे सामान ची मागणी केली असल्याचे आधिकारी सांगत असून याचा फटका डीग्रस फिटर वरील गावांना बसत असून याचा सर्वांत जास्त मानसिक त्रास जनमित्र यांना सहन करावा लागतो त्याना नेमून दिलेल्या गावातील ब्रेक डाऊन काढण्यासाठी गावठाण व कृषी बंद करून घेऊन बिघाड शोधावा लागत आहे व परिणामी त्यांना गावकरी व शेतकरी यांच्या ही रोषाला सामोरे जावे लागत आहे तर काही ऑपरेटर नियम सांगत असल्याने व आधिकारी वसुलीसाठी तगादा लावत असल्याने या सर्व प्रकारात व्हीसीबी नादुरुस्तीचा त्रास नागरिक यांच्या बरोबरीत जनमित्रांना त्रास सहन करावा लागत आहे. व वातावरणात वाढलेल्या उकाड्याने जीव कासावीस होत असताना रुग्णांचे व लहान मुले व नागरिक या सर्वांचे तर हाल या अघोषित भारनियमन ने होत असून आधिकारी सदर काम लवकरच करू हा पाढा नेहमीच सुरू ठेवीत असून लवकरच आता परिसरातून उद्रेक होण्याची शक्यता नाकारता येत नाही तसेच दिवसभरात देऊळगाव मही ३३/११केव्ही सब स्टेशन अंतर्गत असणारे डीग्रस फिटर गावठाण व कृषी दिवसभरात एक तास सुद्दा सुरळीत चालू शकत नाही एवढे मात्र खरे! डीग्रस फिटर गावठाण व कृषी नेहमीच रडगाणे असतांना आधिकारी नुसते वेळ मारून नेत कायमस्वरूपी उपाय योजना करण्यात येत नाही तर या भागाचे लोकप्रतिनिधी यांना तर याकडे लक्ष देण्यास वेळ नाही हे वास्तव आहे!

डीग्रस गावठाण व कृषी लांबी जास्त असल्याने या फिटर वर मध्यभागी नवीन ओव्हरलोड फिटर कार्यान्वित करणेय आवश्यक आहे ते मध्यबिंदू



च्या ठिकाणी करण्याची गरज असतांना आधिकारी नुसते लवकरच नवीन फिटर होईल हे बोलून मोकळे होत आहे डीग्रस फिटरचे नेहमीच रडगाणे असल्याने यावर वीज पुरवठा सुरळीत चालत नसल्याने व एकाच व्हीसीबीवर गावठाण व कृषी असल्याने वारंवार ट्रीपिंग मुळे जनजीवन विस्कळीत होत असताना कोणीच याकडे लक्ष देत नसल्याने प्रसार माध्यम प्रतिनिधी यांना रुग्ण ,वृद्ध , भ्रमणध्वनी वरून याबाबत आवाज उठविण्याची मागणी करीत आहे कृषी पपं बिघाड ची डोखेदुखी कायमच अगोदरच सातव्या दिवशी आलेल्या कृषी पपं वीज पुरवठा बिघाड झाला तर देऊळगाव मही येथील एबी स्विच खराब असल्याने जनमित्र यांची डोखेदुखी शेतकरी वर्ग यांच्या बरोबरीने वाढली आहे.

# किनगाव जग परिसरातील शेतकरी पीक विम्याच्या भरपाईपासून वंचित !

**जनसंचलन/ किनगाव जग**

परिसरात मागील वर्षी खरीप हंगामात पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. मात्र, परिसरातील शेतकरी पीक विम्याच्या नुकसान भरपाईपासून अद्यापही वंचित आहेत. पीक विमा भरपाई रक्कम बँक खात्यात तत्काळ जमा करण्यात यावी, अशी मागणी परिसरातील शेतकऱ्यांकडून होत आहे. मागील वर्षी खरीप हंगामात पेरणीव-ेळी पावसाचे आगमन उशिरा झाल्याने पेरणीला जवळपास एक महिना उशीर झाला होता. मूग, उडदाच्या पेरणीची वेळ निघून गेल्याने हे दोन्ही पिके हा-तची गेली होती. सोयाबीन, कपाशीचे पीक ऐन फुलधारणेत असताना पावसाने खंड दिल्याने फुलांची गळती झाली तर पिकांवर सोंगणीवेळी अतिवृष्टी झाल्याने उभ्या पिकांची नासाडी झाली. यामुळे पिकांवर केलेला खर्चही वसूल झाला नाही. शासनाकडून पिकांना सुरक्षा कवच म्हणून प्रधानमंत्री पीक विमा योजना सुरू करण्यात आली आहे. परिसरातील बहुतांश शेतकऱ्यांनी पीक विमा काढलेला आहे. ज्या शेतकऱ्यांचे नुकसान झाले, त्या शेतकऱ्यांनी त्यांच्या नुकसानासंदर्भात ऑनलाइन तक्रारीही केल्या आहेत परंतु, अद्यापही परिसरातील शेतकऱ्यांच्या बँक खात्यात नुकसानभरपाईचा एक रुपयाही जमा




झालेला नाही. आता खरीप हंगामाची पेरणी जवळ आली आहे. त्यामुळे खते आणि बियाण्यांसाठी शेतकऱ्यांना आर्थिक चणचण भासत आहे. पीक नुकसानभरपाईची रक्कम तत्काळ देण्यात यावी, अशी मागणी परिसरातील शेतकऱ्यांकडून केली जाता आहे.

# जगाला बुध्द तत्वज्ञानाची गरज संदिप गवई

## बुद्ध पौर्णिमा तथागत ग्रुपच्यावतिने मोठ्या उत्सहात साजरी.

**जनसंचलन/मेहकर**

बुद्ध पौर्णिमे निमित्त डॉ.बाबासाहेब आंबेडकर वाटीका मेहकर येथे खिरदान वाटप तसेच वृक्षारोपण, व तथागत भगवान गौतम बुद्धांच्या प्रतिमेचे पूजन व तथागत गौतम बुद्ध यांच्या चरणी पुष्प अर्पण करून आदरांजली वाहून सर्वाना बुद्ध जयंतीच्या शुभेच्छा दिल्या. व भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार बोधिसत्व, महामानव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यांचे पूजन करून त्यांना अभिवादन तथागत ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष संदिपभाऊ गवई यांनी केले. याप्रसंगी आपले विचार व्यक्त करताना बोलत होते, अनिष्ट व कालबाह्य रूढी, अंधश्रद्धा व मानवतेला शरमेने मानखाली घालायला लावणाऱ्या गोष्टीच्या विरोधात बंड पुकारणारे तथ-ागत भगवान गौतम बुद्ध हे केवळ एक



धर्म संस्थापकच नव्हे तर संपूर्ण मानव-तेला मुक्तीचा मार्ग दाखवणारे महात्मा होते. तब्बल अडीच हजार वर्षांपूर्वी सत्य, अहिंसा, शांती आणि प्रेमाचा संदेश जगाला देणाऱ्या गौतम बुद्धांची शिकवण आजही तेवढीच समायोजित असून आजच्या समाज जीवनाला व भविष्यातील आपल्या वाटचालीला कायमस्वरूपी दिशादर्शक असल्याचे मत संदिपभाऊ गवई यांनी व्यक्त केले..

# चिखली शहरातील आपत्तीजनक होर्डिंग्स बोर्ड तात्काळ हटवा - मनसेची मागणी

**जनसंचलन/बुलढाणा**

गत काही दिवसापूर्वी मुंबई घाटकोपर येथे अनाधिकृत होर्डिंग्स बोर्ड (जाहिरात फलक) कोसळुन मोठी दुर्घटना झाली आहे. यामध्ये १९ निष्पाप नागरीकांचा दुर्देवी मृत्यु झाला तर सुमारे ९१ जण गंभिर रित्या जखमी झाले आहे. चिखली शहरात अशाच प्रकारचे अनेक अनाधिकृत होर्डिंग्स बोर्ड (जाहिरात फलक) ठिकठिकाणी लावलेले आहे. या होर्डिंग्स बोर्डामुळे पुन्हा मुंबई घाटकोपर सारखी एखादी दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वती-ने दिनांक २४ मे २०२४ रोजी मुख्याधिकारी चिखली यांना निवेदन देण्यात आले. तरी चिखली शहरा-तील असलेले खामगांव चौफुली, बुलडाणा बायपास, अशोका लॉज जवळ, रेस्ट हाऊस, बस स्थानक परीसर, कामाक्षी हॉटेलवर, गवारे कॉम्प्लेक्स, हॉटेर माहेर, उबाळे यांचे स्नेहा स्टिल वर, महाबिज जवळ, माँ साहेब जिजाउ पुतळयाजवळ, जाफ्राबाद रोड, राजे संभाजी नगर मधील देशमुख यांचे घरावर इत्यादी ठिकाणचे संपुर्ण होर्डिंग्स बोर्ड तात्काळ हटविण्यांत यावे. अन्यथा



महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने तीव्र स्वरूपाच्या आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला. त्यावेळी मनसे जिल्हाध्यक्ष गणेश बरबडे, उपजिल्हाध्यक्ष राजेश परिहार, तालुकाध्यक्ष विनोद खरप-ास, मनसे विद्यार्थी सेना जिल्हाध्यक्ष शैलेंद्र कापसे, मनसे रस्ते आस्थाप-ना जिल्हा संघटक प्रदीप भवर, तालुका सचिव प्रवीण देशमुख, उपशहर अध्यक्ष रवी वानखेडे, शहर सचिव अजय खरपास, उप तालुकाध्यक्ष मयूर पऱ्हाड, शेतकरी सेना तालुकाध्यक्ष अरुण येवले, विभाग अध्यक्ष समाधान मस्के, मंगेश उगले, दिनकर खरपास, पंढरी मैद, युसुफ शेख, मधुकर ठेंग, संजय दळवी, अंकित कापसे यांसह अन्य पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

## शेळी, कुक्कुट,गाय,म्हैस पालन प्रशिक्षण

जनसंचलन/बुलढाणा

महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्रातर्फे शेळी, कुक्कुट, गाय आणि म्हैस पालन प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे. इच्छुकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राद्वारा जिल्हा उद्योग केंद्रामार्फत उद्योग, व्यवसाय सुरु करू इच्छिणाऱ्या सुशिक्षित बेरोजगार युवक, युवतींसाठी बुलडाणा येथे शेळी, कुक्कट, गाय, म्हैस पालन प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन दि. १ ते ५ जून २०२४ या पाच दिवसाच्या कालावधीत करण्यात आले आहे. या प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश सुशिक्षित बेरोजगारांनी तंत्रशुद्ध प्रशिक्षण घेऊन स्वत:चा उद्योग व्यवसाय सुरु करावा हा आहे. सदर प्रशिक्षणात शेळी, कुकुट आणि गाय म्हैस पालनाचे तंत्र आणि प्रकार त्यांच्या जाती, लसीकरण, संशोधन रोग व लक्षणे, खाद्यनिर्मिती व चार्याचे प्रकार व उद्योग सुरु करण्यासाठी संपूर्ण सहकार्य त्यासोबतच उद्योजकता विकास, उद्योग संधी मार्गदर्शन, सहकार्य, शासकीय योजनांची माहिती आदी प्रशिक्षणात मार्गदर्शन तज्ज्ञ व्यक्ती करणार आहे. प्रशिक्षणात प्रवेश घेऊ इच्छिणारा उमेदवार किमान पाचवी पास, वय १८ ते ५० वर्षे असावे. प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण केल्यानंतर प्रमाणपत्र दिले जाईल, प्रशिक्षण नोंदणीसाठी दि. १ जून २०२४ पर्यंत कार्यालयीन वेळेत गणेश गुप्ता, प्रकल्प अधिकारी, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, तहसील कार्यालयाजवळ, चिखली रोड, बुलडाणा संपर्क क्रमांक ८२७५०९३२०१, ९०११५७८८५४ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन विभागीय अधिकारी प्रदीप इंगळे यांनी केले आहे.

# जिल्ह्यात वादळी वाऱ्यासह मुसळधार अवकाळी पावसाने केला हाहाकार

## जिल्ह्यात शेकडो झाडे पडले अनेक घरावरील टीन पत्रे उडाले

## ग्रामीण भागासह मलकापूर भागात प्रचंड नुकसान

जनसंचलन/बुलढाणा

दिवसभर उन्हाची चटके बसत असताना सायंकाळी वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाने आगमन केले व अनेकांचे नुकसान सुद्धा केले वादळी वाऱ्याचे मुसळधार पावसाने जिल्ह्यात प्रचंड तांडव केला. जळगाव जामोद संग्रामपूर शेगाव खामगाव नांदुरा मलकापूर बुलढाणा मेहकर या तालुक्यात अवकाळी पावसाने वादळी वाऱ्यासह दमदार हजेरी लावली यामुळे एका तासातच जनजीवन विस्कळीत झाले. जळगाव जामोद तालुक्यात खांडवी ते पिंपळगाव काळे रोडवर २५ झाडे रस्त्यावर पडले यामुळे रस्ता ठप्प झाला असून विद्युत पोल सुद्धा कोसळले आहे त्यामुळे विद्युत पुरवठा खंडित झाला. शेगाव तालुक्यात सुद्धा तीच चित्र पाहायला मिळाले १४ वर्षीय नवी शिकणारा वेदांत शेगोकार हा विद्यार्थी वडिलांसोबत शेतात गेला असता त्याच्या अंगावर वीज कोसळली त्यात त्याचा मृत्यू झाला. संग्रामपूर तालुक्यात वादळी वाऱ्यामुळे शेतातील केळीची झाडे सुद्धा झोपली आहे तर बुलढाण्यात सुद्धा हवेचा जोर वाढला नागरिकांची चांगली झोप उडाली. यामध्ये खामगाव शेगाव रोडवरील भली मोठी कमान वादळी वाऱ्याने कोसळले त्यामुळे शेगावला जाणारी वाहतूक ठप्प झाले आहे तसेच मेहकर तालुक्यातील टेंभुर्णी फाट्याजवळ सुद्धा दिशा फलक असणारी कमान कोसळून खाली पडली. तर मलकापूर येथील मंदिराचा पिल्लर तुटून एक वृद्ध व्यक्तीच्या डोक्यात कोसळला त्यामुळे त्याचा जागीच मृत्यू झाला. मलकापूर सोलापूर महामार्गावरील दाताळा गावानजीक असलेला टोलनाका सुद्धा कोसळला आहे सुदैवाने यामध्ये जीवित हानी टळली मात्र चार कर्मचारी हे जखमी झाले आहे. या घटनेमुळे वाहतूक ठप्प महामार्ग हा पूर्णतः बंद झाला होता. या वादळी अवकाळी पावसाचा फटका मलकापूर पोलीस स्टेशनला सुद्धा



बसला आहे शहर पोलीस स्टेशन इमारतीवर असलेली टीन पत्रे उडाली आहे यामध्ये क्राईम रेकॉर्ड भिजले तसेच संगणक लॅपटॉपचेही मोठे नुकसान झाले रात्री विद्युत नसल्याने कामकाज सुद्धा ही रात्रीपासून बंद होते. सकाळपासून बाहेर बसून कामकाज सुरू करण्यात आले आहे. सध्या जिल्ह्यात सर्वात जास्त नुकसान खामगाव मलकापूर शेगाव जळगाव जामोद नांदुरा या ठिकाणी झाले आहे. जिल्ह्यात आलेल्या या अवकाळी वादळी मुसळधार पावसामुळे अनेकांचे नुकसान झाले आहे तर काहींचा मृत्यू सुद्धा झाला तर काहीजण जखमी झाले आहे

# नागरिकांनी डाक जीवन विमा योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

जनसंचलन/बुलढाणा

भारतीय डाक विभागामार्फत डाक जीवन विमा व ग्रामीण डाक जीवन विमा या योजनाद्वारे नागरिकांना विमा सुरक्षा देण्यात येतात. याचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन डाक विभागातर्फे करण्यात आले आहे. यामधील डाक जीवन विमा या कल्याणकारी योजनेची सुरुवात १ फेब्रुवारी १८८४ रोजी करण्यात आली आहे, या योजनेची व्याप्ती वाढविण्यात आली आहे. यात आता केंद्र सरकारचे कर्मचारी, राज्य सरकारचे कर्मचारी, स्थानिक स्वराज्य संस्थाचे कर्मचारी, भारतीय रिझर्व बँक, सरकारी बँक, खासगी बँकेचे कर्मचारी, शैक्षणिक संस्था शाळा, महाविद्यालये, विद्यापीठाचे कर्मचारी, सनदी लेखापाल, वकील, डॉक्टर, एनएससी, बीएससीवर सूचीवद्ध झालेल्या कंपन्यांतील कर्मचारी, सर्व पदवीधर आणि डिप्लोमाधारक यांचा समावेश करण्यात आला आहे. तसेच ग्रामीण डाक जीवन विमा ही योजना २४ मार्च १९९५ ला ग्रामीण भागातील नागरिकांना विमा सुरक्षा प्रदान करण्यासाठी सुरु करण्यात आली. यामध्ये वय वर्षे १८ ते ५५ या वयोगटातील ग्रामीण भागातील रहिवासी या योजनेचा लाभ घेऊ शकतात. डाक विभागाच्या योजना या कमी प्रीमिअम जास्त बोनस या तत्वावरील आहेत. भारतीय डाक विभागामार्फत चालविल्या जाणाऱ्या या योजना कमी प्रीमिअम जास्त बोनस यामुळे नागरिकांच्या पसंतीस उतरत आहेत. आतापर्यंत जवळपास दीड कोटीहून अधिक नागरिकांनी याचा लाभ घेतला आहे. उत्कृष्ट परतावा देणाऱ्या विमा योजनेचा लाभ घेण्याकरिता नागरिकांनी जवळच्या पोस्ट ऑफिसशी संपर्क साधावा, असे आवाहन डाक अधीक्षक गणेश आंभोरे यांनी केले आहे.

## खामगाव आयटीआयमधील साहित्य लिलाव रद्द

जनसंचलन/खामगाव


खामगाव औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत प्रशिक्षणादरम्यान निकामी झालेले हत्यारे, औजारे, साहित्याचा जाहिर लिलाव दि. २२ मे २०२४ रोजी दुपारी ४.३० वाजता संस्थेत ठेवण्यात आला होता. परंतू काही तांत्रिक अडचणीमुळे सदर जाहिर लिलाव पुढील आदेशापर्यंत स्थगित करण्यात आला आहे, असे औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य, यांनी कळविले आहे.

# विनापरवानगी अहिल्याबाई होळकर यांचा पुतळा बसवला...

## रोहडा गावात अज्ञात आरोपी विरुध्द गुन्हा दाखल

जनसंचलन/बुलढाणा

तालुक्यातील रोहडा या गावात २६ मे रोजी अहिल्याबाई होळकर यांचा पुतळा कोणीतरी अज्ञात व्यक्तींनी कोणाचीही परवानगी न घेता, अनधिकृतपणे उभारल्याने रामकृष्ण गोविदा सोरमारे वय ५५ वर्ष रा. रोहडा यांच्या तक्रारीवरुन अंढेरा पोलिसांनी अज्ञात संशयितांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. याबाबत पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, रोहडा या गावामध्ये धनगर समाज बांधवांची ५०० ते ६०० लोकसंख्या आहे. अशा या गावामध्ये कोणीतरी अज्ञात आरोपींनी कोणत्याही शासकीय कार्यालयाची परवानगी न घेता पुण्यशलोक अहिल्याबाई होळकर याचा विनापरवाना अनिधिकृतपणे पुर्णाकृती पुतळा बसविलेला आहे. या घटनेची माहिती अंढेरा ठाणेदार विकास पाटील यांना लागताच तात्काळ पोलीस कर्मचारी घेवून घटनास्थळी धाव घेतली. गावात पोलिसांचा बंदोबस्त पाहून मोठ्या संख्येने गावकरी गोळा झाले पोलिसांनी पुतळा कोणत्या व्यक्तीने बसविला असे विचारले असता त्यावर कोणत्याही व्यक्तीने होकार दिला नाही. आणि कोणीही जबाबदारी घेण्यास तयार नव्हते. त्यामुळे पुतळ्याची विटंबना होवू नये म्हणुन ठाणेदार यांनी रामकृष्ण गोविदा सोरमारे वय ५५ वर्ष रा. रोहडा यांच्या तक्रारीवरुन डायरी अंमलदार विजय जाधव यांनी अज्ञात व्यक्ती विरुध्द कलम ४४७ भादवी, सहकलम ११ महाराष्ट्र पुतळ्याच्या पवित्र भगास प्रतिबंध अधिनियम १९९७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



याबाबत अंढेरा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक विकास पाटील यांनी परिस्थितीची पाहणी करून गावात शांतता व सलोखा राखण्याचे आवाहन केले आहे. याबाबतचा अधिक तपास हवालदार कैलास उगले करीत आहेत. विनापरवानगी अहिल्याबाई होळकर यांचा पुतळा बसवला

# शिवसाई ज्ञानपीठ व युनिव्हर्सल स्कुल ची १००% निकालाची यशस्वी परंपरा कायम

## शिवसाईच्या विद्यार्थ्यांची उत्तुंग भरारी - डी एस लहाने सर

जनसंचलन/बुलढाणा

माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा मार्च-२०२४ मध्ये पार पडलेल्या महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक परीक्षेचा निकाल जाहिर झाला असून. या निकालात दर वर्षी प्रमाणे शिवसाई ज्ञानपीठ व युनिव्हर्सल स्कुल, बुलडाणा ने आपली १०० % निकालाची परंपरा कायम राखली आहे. यावर्षी शिवसाई चे एकूण ४९ विदयार्थी परीक्षेसाठी प्रवेशित झाले होते त्यापैकी प्राविण्य श्रेणीत एकूण ४९ पैकी ४९ विद्यार्थ्यांनी प्राविण्य श्रेणीत यश मिळवले आहे.

विद्यालयातून धनंजय उमेश शिंदे (९६.४%),सोमनाथ गजानन जाधव (९५.६%), जयदीप गणेश जाधव (९५.४%), दक्ष चंदन चव्हाण (९५.%), ओम नंदाराम लोखंडे (९३.४%) शंतनु राहुल वाघ (९२.८%) साहील सुभाष उबरंहांडे (९२.४%), आलोक रमेश देशमुख (९२.२%)ऋतुजा ज्ञानेश्वर पोफळे (९१.६%), साक्षी सुनील




बाहेकर(९१.६%), श्रेयस पुरुषोत्तम डुकरे (९१.४%), तेजस गजानन लहासे (९१%), श्रवण गणेश लहाने(९१%), रितेश सुरेश घोती (९०.६%), पूर्वा कृष्णा मांडवे (९०.२%), हर्षल संजय जाधव (८९.६%) अदिती जाधव ८९.६०% स्नेहा गजानन रोजेकर (८९.४%)प्राप्त करून यश मिळविले आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे शिवसाई ज्ञानपीठ व युनिव्हर्सल स्कुल चे अध्यक्ष श्री. डी. एस. लहाने सर यांनी अभिनंदन करून भावी वाटचालीस शुभेच्छ्या दिल्या व भविष्यामध्ये आपण जे काही ध्येय ठरवले असेल त्याच्या अनुशांगाने मार्ग्रक्रमण करून साध्य करावे व आपण देशाचे ,समाजाचे ऋण फेडावे असे प्रतिपादन केले. तसेच विद्यार्थ्यांनी प्राप्त केलेल्या उत्तुंग यशासाठी प्राचार्य प्रमोद मोहरकर यांनी शुभेच्छा दिल्या व यशस्वी विद्यार्थ्यांना पेढे भरवून सत्कार केला. या यशामागे मार्गदर्शक शिक्षक श्री. ज्ञानेश्वर मोहोरकर, सविता काळे, कल्पना जगताप, श्री. भागवत उबरहंडे, श्री. गोपाल आडवे तसेच पालकांचे मोलाचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले आहे.

# डाळीचा साठा दर शुक्रवारी नोंदविण्याचे आवाहन

जनसंचलन/बुलढाणा




केंद्र शासनाच्या निर्देशानुसार डाळ साठा असणाऱ्यांनी दर शुक्रवारी डाळ साठाची नोंदणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती आणि त्याची उपलब्धता याबाबत देखरेख व नियंत्रण करण्यासाठी केंद्र शासनाच्या निर्देशानुसार तूर, उडीद, चना, मसूर आणि मूगाचे व्यापारी, प्रोसेसर, सर्व मिलर्स, मोठे साखळी विक्री आयातदार आदी भागदारकांनी यांच्याकडे उपलब्ध असलेला डाळीचा साठा केंद्र शासनाच्या fcain-foweb.nic.in/psp/ पोर्टलवर नोंदविण्यात यावा. तसेच सदर साठा दर शुक्रवारी अद्यावत करावा. केंद्र शासनाच्या पोर्टलवर नोंदणी केलेले भागधारकांनी जाहिर केलेल्या डाळीचा साठा व प्रत्यक्षात गोदामामध्ये असलेल्या साठ्याच तपासणी करावी. यात तफावत आढळल्यास अहवाल तयार करुन तो समन्वय अधिकारी (डाळी साठा) यांच्या निदर्शनास आणावा, असे आवाहन जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी केले आहे.

# चोविस तासांपासून वीज यंत्रणा दुरूस्तीचे युध्दपातळीवर काम सुरू

## महावितरण कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त अतीरिक्त १५० कंत्राटदार कर्मचारी मदतीला

जनसंचलन/बुलढाणा



जिल्ह्यात काल संध्याकाळच्या दरम्यान मलकापूर ,खामगाव,शेगाव,नांदुरा आणि संग्रामपूर भागात झालेल्या चक्रीवादळामुळे उध्वस्त झालेली वीज यंत्रणा पुर्ववत करण्यासाठी महावितरणची यंत्रणा २४ तासांपासून युध्दस्तरावर कार्यरत असल्याने अनेक भागाचा वीज पुरवठा पुर्ववत करण्याला यश आला आहे.उर्वरीत भागाचा वीज पुरवठा दुरूस्तीसाठी कर्मचारी कार्यरत आहे. जिल्ह्यात झालेल्या चक्रीवादळाचा वेग एवढा प्रचंड होता की,उच्चदाब व लघुदाबाचे शकडो वीज खांब जमिनदोस्त झाल्यामुळे मलकापूर आणि खामगाव विभागील २३ उपकेंद्रे ही अंधारात गेली होती.यामध्ये ३३ केव्ही सालीपुरा, ३३ केव्ही जांभूळधावा , ३३ केव्ही हरसोळा, ३३ के.व्ही. एपीडीआरपी, ३३ केव्ही दाताळा , ३३ केव्ही बेलाड, ३३ केव्ही दसरखेड, ३३ केव्ही नांदुरा ,३३ केव्ही फुली , ३३ केव्ही महाळुंगे , ३३ केव्ही सुजातपुर , ३३ केव्ही नायगाव , ३३ केव्ही चांदुर , ३३ केव्ही मोताळा , ३३ केव्ही पोफळी , ३३ केव्ही किनोळा , ३३ केव्ही वाघजळ, ३३ केव्ही सावरगाव, ३३ केव्ही वडजी, ३३ केवी पिंपळगाव काळे, ३३ केव्ही आसलगाव,३३ केव्ही नारखेड आणि ३३ केव्ही निमगाव उपकेंद्राचा समावेश आहे. कार्यकारी अभियंता रत्नदिप तायडे आणि मुळे यांच्या मार्गदर्शनात रात्रीतून सुरू केलेल्या कामामुळे ३३ केव्हीसालीपुरा,३३ केव्ही जांभूळधावा,३३ केव्ही दाताळा,३३ केव्ही नांदुरा,३३ फुली, ३३ केव्ही महाळुंगे,३३ केव्ही सुजातपुर,३३ केव्ही नायगाव,३३ केव्ही चांदुर,३३ केव्ही पोफळी आणि ३३ केव्ही किनोळा उपकेंद्राचा वीज पुरवठा पुर्ववत करण्यात आला आहे. बुलडाणा विभागात ३३ केव्ही किनगाव आणि ३३ केव्ही साखरखेर्डा उपकेंद्राचा बंद पडलेला वीज पुरवठा रात्रीतून पुर्ववत करण्यात आला आहे.परंतू किरकोळ दुरूस्ती करण्याचे काम सुरू आहे.याशिवाय जिल्हयात खामगाव विभागातील खामगाव,शेगाव,संग्रामपूर परिसरात वादळाचा फटका बसल्याने शेकडो वीज खांब जमिनदोस्त झाले आहे.महावितरणच्या अविरत प्रयत्नाने शेगावचा वीज पुरवठा पुर्ववत करण्यात आला आहे.खामगावाचाही बराच भाग पुर्ववत झाला आहे. उर्वरीत वीज पुरवठा सुरळीत करण्यासाठी कर्मचारी व कंत्राटदार एजन्सीचे कर्मचारी कार्यरत आहे.

# जिल्ह्यात दिव्यांग, आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाचे सर्व्हेक्षण

## सर्व्हेक्षणास नागरिकांनी सहकार्य करावे-जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील

जनसंचलन/बुलढाणा

जिल्ह्यातील दिव्यांग आणि आत्महत्याग्रस्त कुटुंबाचे सर्व्हेक्षण करण्यात येत येत आहे. आशा आणि अंगणवाडी सेविकांच्या मदतीने औरंगाबाद येथील महात्मा गांधी सेवा संघ घरोघरी जाऊन प्रत्येक कुटुंबाचे सर्व्हेक्षण करीत आहे. यातून जिल्ह्यातील दिव्यांग, एकल महिला, परितक्त्या आणि आत्महत्याग्रस्त कुटुंबाची स्थिती समोर येण्यास मदत होणार आहे. नागरिकांनी या सर्व्हेक्षणास सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे. जिल्ह्यात सर्व्हेक्षण करताना मागील काळात कुटुंबातील सदस्यानी केलेली आत्महत्या, आत्महत्या करणाऱ्या व्यक्तीचा व्यवसाय, आत्महत्येचे कारण, आत्महत्या करणाऱ्या व्यक्तीचे वय, आत्महत्या करणाऱ्या व्यक्तीला असणारी मुले व मुली, आत्महत्या करणाऱ्या व्यक्तीच्या पत्नी किंवा पतीचे नाव, कुटुंबात असणाऱ्या एकल महिला, विधवा, परित्यक्ता, तृतीयपंथी यांच्याबाबत माहिती घेण्यात येणार आहे. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ नुसार दिव्यांग व्यक्तींचे २१ प्रकार निश्चित करण्यात आले आहेत. त्यानुसार दिव्यांग व्यक्तींच्या संख्येत लक्षणीय वाढ झालेली आहे. तसेच कायदा लागू झाल्यानंतर दोन वर्षात राज्यातील सर्व दिव्यांग विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण करण्याचे सूचित केले आहे. त्याचप्रमाणे राज्य शासन आणि स्थानिक स्वराज्य संस्थांनी दिव्यांग व्यक्तीसाठी आरोग्य सुविधा, तसेच दिव्यांगत्व प्रतिबंधात्मक उपाय करण्यासाठी उपक्रम, योजना तयार कराव्यात. त्यानुसार दिव्यांगाचे सर्वेक्षण, तपासणी आणि दिव्यांगत्वाचे कारण शोधण्यासाठी संशोधन करण्यात येणार आहे. दिव्यांगांच्या एकूण लोकसंख्येची किंवा त्यांची सामाजिक-आर्थिक स्थिती शासनाकडे अचूक नोंद उपलब्ध होण्यासाठी सदर सर्वेक्षण उपयुक्त ठरणार आहे. या सर्वेक्षणातून माहितीच्या आधारे दिव्यांग व्यक्तीच्या सर्वांगिण विकासाकरिता विविध उपक्रम व योजनांचे नियोजन करण्यात येणार आहे. दिव्यांग व्यक्तीकरीता योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी माहितीचे संकलन करणे, दिव्यांग व्यक्ती विषयक संशोधन करण्यासाठी दिव्यांग व्यक्तींच्या समस्या, गरजा ओळखणे व त्यांचे सर्वांगीण पुनर्वसन करुन त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याच्या दृष्टीने माहिती संकलित करण्यासाठी दिव्यांग व्यक्तींचे घरोघरी जावून सर्वेक्षण करण्यात येत आहे. दिव्यांगांना आरोग्य, रोजगार, स्वयंरोजगार, शिक्षण, प्रशिक्षण, दिव्यांगत्वाचे कारण समजून घेण्याकरिता समाजामध्ये जागरूकता मोहीम राबविणे, लहान वयातच दिव्यांगत्व ओळखून, ते कमी करण्यासाठी, त्याचा शोध घेवून शीघ्र निदान व त्वरीत उपचार करणे, त्यांच्या पुनर्वसनास प्रोत्साहन देणे आदी उपाययोजना करण्यासाठी दिव्यांग व्यक्तींचे सर्वेक्षण सुरू आहे. दिव्यांग व्यक्तींचे सर्वेक्षण जिल्ह्यातील सर्व शहरे, गावे, वाडी-वस्ती, तांडे व पाड्यामध्ये करण्यात येणार आहे. तसेच सर्व महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायत, ग्रामपंचायत, कटक मंडळामध्ये राबविण्यात येणार आहे. सर्व्हेक्षण करण्यासाठी आशा गट प्रवर्तकांकडून गावस्तरावरील आशा, अंगणवाडी सेविकांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. यात जनतेचा सहभाग वाढावा, यासाठी लोकप्रतिनिधींनाही सहभागी करण्यात येणार आहे.